# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-26.08.2026** **वार- बुधवार**

---

**फडणवीस**

चाकण-भोसरीच्या औद्योगिक पट्ट्याला नवी ऊर्जा देणा-या ४९ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसोबतच्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून २ हजार ३२० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. ते आज मुंबईत एका कार्यक्रमात बोलत होते. या गुंतवणुकीतून उत्पादनक्षमता वाढण्यासोबतच हजारो रोजगारांच्या नव्या संधी निर्माण होतील आणि ग्रोथ इंजिन असणाऱ्या पुणे परिसरातील औद्योगिक परिसंस्थेलाआणखी बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

**चाकण**

चाकणच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने कामाचा भविष्यातील नियोजन केले असून, समितीला आवश्यक त्या सूचना आणि हरकती समजून घेऊन काम करण्यास पूर्ण सहकार्य केले जाईल असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज केलं आहे . चाकण परिसरातील रस्ते दुरुस्ती, वाहतूक कोंडी निवारण आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी उच्चस्तरीय समिती तसेच तक्रार निवारण कक्ष कामकाजाचा आढावा बैठकीनंतर त्या बोलत होता. चाकण परिसरातील खड्डे 31 ऑगस्टपर्यंत खड्डे बुजविण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.
दरम्यान चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी, पायाभूत सुविधा, वीज आणि पाणीपुरवठ्याच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स पुढाकार घेणार आहे.

**साखर**

गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वाढणारे साखरेचे दर आता आटोक्यात येण्यास सुरुवात झाली असून पुण्यातील बाजारपेठेत घाऊक दरात घसरण सुरू झाली आहे. साखरेच्या दरवाढीमागे ऊस मोठ्या प्रमाणावर इथेनॉल निर्मितीसाठी वळवला जात असल्याची चर्चा ; ही केवळ अफवा असून सध्याची दरवाढ कृत्रिम असल्याचा दावा साखर उद्योगातील पदाधिकाऱ्यांनी केला आहे. साखरेच्या दरात गेल्या काही दिवसांत झालेली वाढ ही कृत्रिम स्वरूपाची असल्याचं राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष प्रकाश नाईकनवरे यांनी म्हटलं आहे. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखानदाराची संघटना अध्यक्ष बी.बी.ठोंबरे यांनीही दरवाढीमागे व्यापाऱ्यांची कृत्रिम साठेबाजी कारणीभूत असल्याचे सांगितले.

**बस**

पीएमपीएमएल अर्थात पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या ताफ्यात ई-बस आणि सीएनजी बसची संख्या वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वाहतुकीच्या पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याचे नियोजन करण्यात आलं आहे. त्यानुसार पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात अप्पर इंदिरानगर, भोसरी, मोशी, वाकड आणि बालेवाडी येथे पाच नवीन ई-बस चार्जिंग स्टेशन्स उभारण्याचे नियोजन आहे. तसेच स्वारगेट आणि शेवाळेवाडी येथे दोन नवीन सीएनजी स्टेशन्स सुरू करण्यासाठी चाचपणी सुरू आहे. सध्या पीएमपीएमएलकडे आठ ई-बस डेपो पूर्णपणे कार्यान्वित आहेत. भविष्यातील विचार करून स्वारगेट आणि शेवाळेवाडी इथं आणखी दोन सीएनजी स्टेशन्स सुरू करण्याच्या दृष्टीने चाचपणी केली जात आहे.

**‘ग्लोबल गुरुजी’**

पुणे जिल्हा परिषदेच्या ‘ग्लोबल गुरुजी’ या आंतरराष्ट्रीय शिक्षक अनुभव उपक्रमांतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांमधील ४५ शिक्षकांची निवड केली जाणार आहे. यासाठी निवडलेल्या शिक्षकांना सिंगापूर येथील शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी पाठविण्यात येणार आहे. या निवड प्रक्रियेच्या दुसऱ्या टप्प्यात टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतील तज्ज्ञ समितीकडून १३६ शिक्षकांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. येत्या ५ सप्टेंबर रोजी अंतिम निवड यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

**पुरस्कार**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुणांना शिक्षणासोबत रोजगाराची संधी देणाऱ्या यशस्वी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी यांना आडकर फौंडेशनतर्फे ‘जिद्द जीवनगौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यशस्वी ग्रुपच्या ‘शिका आणि कमवा’ या उपक्रमाचे कौतुक करताना हा उपक्रम म्हणजे महाराष्ट्राचे अभिनव मॉडेल असल्याचं डॉ. सबनीस यावेळी म्हणाले. आर्थिक परिस्थितीमुळे शिकू न शकणाऱ्या मुलांसाठी काही पर्याय नसल्यामुळे त्यांच्यासाठी वेगळी वाट निर्माण केली असल्याचं विश्र्वेश कुलकर्णी सत्काराला उत्तर देताना सांगितलं.

**ईदएमिलाद**

पुण्यात प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त ईद-ए-मिलाद हा सण शांतता आणि उत्साहपूर्ण तसंच धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील विविध मशिदींमध्ये मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन सामूहिक नमाज अदा केली. यावेळी देशात शांतता, सामाजिक एकोपा आणि समृद्धी नांदावी, यासाठी प्रार्थना करण्यात आली. शहरातील विविध भागांत पारंपरिक आणि शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुका अर्थात जुलूस काढण्यात आले. संवेदनशील ठिकाणी पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**पुणे-मुंबईअंतिम**

महाराष्ट्र राज्य आंतर-जिल्हा वरिष्ठ गट महिला फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत गतविजेता पुणे जिल्हा आणि मुंबई संघ आमनेसामने येणार आहेत. उपांत्य फेरीत पुणे जिल्हा संघाने ठाणे जिल्ह्याचा चार-शून्य असा पराभव केला. पुण्याकडून रितिका सिंगने दोन, तर इप्शिता गवारीने दोन गोल केले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई संघाने अहिल्यानगरचा एक-शून्य असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाशत सकाळच्या वेळेत ऊन-पावसाचा खेळ दिसून आला. कमाल तापमान 29 तर किमान तापमान 22 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**